# महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय,मुंबई

## जिल्हा उद्योग केंद्र,जळगांव

# 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

अंतिम मूल्यमापन कार्यपद्धती


# मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देशानुसार १०० दिवसांचा कार्यक्रम उदयोग विभाग – मूल्यमापनासाठी गुणवत्ता तक्ता

| अ.क्र. | निकष |
|---|---|
| 1 | संकेतस्थळ (Website) |
| 2 | सुकर जीवनमान (Ease of Living) |
| 3 | स्वच्छता (Cleanliness) |
| 4 | तक्रार निराकरण (Grievance Redressal) |
| 5 | कार्यालयीन सोयीसुविधा (Office Amenities) |
| 6 | क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Visits to Regional Field Offices) |
| 7 | ई-ऑफिस प्रणाली (E-Office System) |
| 8 | आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन (Promotion of Economic and Industrial Investment) |
| 9 | अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (Officers-Staff training,Service Related, Judicial Matters and use of Artificial Intelligence Technology) |
| 10 | नाविन्यपूर्ण उपक्रम (Innovative initiatives) |


# 1. संकेतस्थळ (WEBSITE)

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | वापरण्यातील सुविधा (User Friendly) | योजना ऑनलाईन असून लाभार्थ्याला कोणत्याही क्षणी वापरण्याची सुविधा आहे.<br>याबाबतची अधिक माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.<br>https://jalgaon.gov.in/<br>https://maitri.maharashtra.gov.in/<br>https://maha-cmegp.gov.in/homepage<br>https://www.kviconline.gov.in/pmegpeportal/pmegphome/index.jsp |
| आ | माहितीचे अद्ययावतीकरण (Updated Information) | मैत्री पोर्टलद्वारे अद्यावत माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. |
| इ | माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण (Proactive disclosure under RTI Act) | जिल्हा पातळीवर योजना ऑनलाईन असल्याकारणाने पारदर्शकता आहे. |
| ई | सुरक्षितता (Data/Cyber Security) | जिल्हा पातळीवर योजना ऑनलाईन असल्याकारणाने त्याबाबत ID व password बाबतीत सुरक्षितता बाळगली जाते. |
| उ | लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करून ऑनलयीन प्रसिद्ध करणे | लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करून कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. |

# लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रदर्शित




# माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्रदर्शित फलक



# 2. सुकर जीवनमान (EASE OF LIVING)

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
| --- | --- | --- |
| अ | नागरी सेवांचे सुलभीकरण (पूर्वीची स्थिती व सुलभीकरणानंतर झालेले बदल यांची तुलना आवश्यक) | |
| १ | विभागाच्या सर्व योजनाची माहिती, सेवाशुल्क, शासननिर्णय, नागरिकांची सनद, लोकसेवा हक्क अधिनियम, प.वै.द. मधील अ,ब,क, ड तक्ते दर्शनी भागात लावणे व अद्ययावत करणे. | विभागाच्या सर्व योजनाची माहिती, सेवाशुल्क, शासननिर्णय, नागरिकांची सनद, लोकसेवा हक्क अधिनियम दर्शनी भागत लावणेत आलेले आहे. |
| २ | कार्यक्षेत्रातील सर्व उद्योगांची नोंदणी करणे | उद्यम नोंदणी संकेतस्थळावर निशुल्क सेवा उपलब्ध आहे. |

# CMEGP माहिती फलक




# 3. स्वच्छता

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | अभिलेखे निंदणीकरण व वर्गीकरण. | अभिलेखे निंदणीकरण, वर्गीकरण काम प्रगतीपथावर |
| ब | मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे | कार्यवाही चालू आहे. |
| इ | जड वस्तू संग्रह नोंवाही अद्ययावतीकरण | कार्यवाही चालू आहे. |
| ई | जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट | कार्यवाही चालू आहे. |
| उ | जुन्या वाहनांचे निर्लेखन | लागू नाही. |

# 4. तक्रार निवारण

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण (दि.१ जानेवारी, २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) | १ जानेवारी २०२५ पूर्वीचे तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे. |
| आ | पी.जी. पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण (दि.१ जानेवारी, २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) | १ जानेवारी २०२५ पूर्वीचे तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे. |
| इ | अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिद्धी | प्रदर्शित केला आहे. |
| ई | लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारींचे निराकरण | लोकशाही दिनामध्ये प्राप्त तक्रारींचे नियमित निराकरण करण्यात येते. |

# अभ्यागतांना भेटण्याची वेळेचा फलक




# 5. कार्यालयीन सोई सुविधा

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | उपलब्ध करण्यात आलेली आहे. |
| आ | कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था | उपलब्ध करण्यात आलेली आहे. |
| इ | अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतीक्षालय व्यवस्था | उपलब्ध करण्यात आलेली आहे. |
| ई | कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे | नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आलेली आहेत. |
| उ | कार्यालयाचे सौंदर्यीकरण | कार्यालयाचे सौंदर्यीकरण वेळोवेळी करण्यात येते. |

# अभ्यागत व कर्मचारी यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



# अभ्यागतांना बैठक व्यवस्था





# कार्यालयीन दिशादर्शक फलके



# 6. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे | लागू नाही. |
| आ | केंद्र आणि राज्य शासनाच्या महात्तवाच्या कार्यक्रम/ प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे. | क्लसटर व इतर प्रकल्पांना वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन करण्यात येते. |
| इ | क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देऊन कामकाजावर देखरेख ठेवणे. | लागू नाही. |
| ई | ग्राम स्तरावरील कर्मचाऱ्यांचे अनुभव, अडचणी व सूचना यावर त्वरित कार्यवाही करणे. | लागू नाही. |

# स्वयंदीप वूमन असोसिएशन क्लस्टर चाळीसगांव

- केवळ दिव्यांग महिलांनी मिळून तयार केलेला अभिनव क्लस्टर प्रकल्प. सदर प्रकल्पात 60 महिला सदस्य असून 1.28 कोटी इतकी प्रकल्प किंमत असून 90 टक्के शासन सहाय्य प्राप्त.दि.28.08.2024 पासून प्रकल्प सुरु आहे.

# INAUGARATION OF SWAYAMDEEP CLUSTER CHALISGAON DT.23.08.2024






- प्रस्तावित औद्योगिक समुहांपैकी
- 1.स्टीचर्स गारमेंट क्लस्टर चाळीसगांव
- 2.सनराईज फुड प्रोसेसिंग  क्लस्टर भादली, जळगांव
- हे दोन्ही क्लस्टर प्रगतीपथावर असून क्लस्टरच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी जिल्हा उदयोग केंद्र जळगांव व उदयोग सहसंचालक कार्यालय नाशिक यांचेकडून क्षेत्रभेटी करण्यात येतात


Shot on OnePlus
24 December 2024 at 4:09 pm




Shot on OnePlus
Khadaki Bk., Nashik Division 2024.08.23 13:26


Shot on OnePlus
24 December 2024 at 4:09 pm

# मा.उद्योग सहसंचालक,नाशिक यांची क्लस्टर प्रकल्पांना क्षेत्रभेट










# 7. ई- ऑफिस प्रणाली

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | प्रशासकीय कामकाजात १ जानेवारी २०२५ पासून ई- ऑफिस प्रणालीचा वापर करणे. | याबाबत कार्यवाही सुरु आहे. |
| आ | ई- ऑफिस प्रणालीत ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे. | याबाबत कार्यवाही सुरु आहे. |

# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे | दि.11 एप्रिल २०२५ रोजी गुंतवणूक परिषदेचे आयोजन करून 40 उद्योग घटकांचे रु. 1636.7 कोटी गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले असून त्यातून 3348 इतकी रोजगारनिर्मिती होणार आहे. |
| आ | व्यापारी/ कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे | दि. 02 जानेवारी २०२५ रोजी जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा घेऊन उद्योजकांच्या अडचणींचा निराकरण करण्याचे प्रयत्न करण्यात आले. |
| इ | गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे | गुंतवणूक परिषदेमध्ये सामंजस्य करार केलेल्या उद्योजकांना वेळोवेळी संपर्क साधून त्यांच्या अडचणींचे निराकरण केले जाते. |
| ई | गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे | दि. 02 जानेवारी २०२५ रोजी जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेत ठरल्यानुसार मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या अध्यक्षतेखाली उद्योगांच्या विषयांबाबत पोलीस सुरक्षा व वाहतूक संबंधित उपसमिती गठीत करण्यात आलेली आहे. |

# गुंतवणूक परिषद दि. 11 एप्रिल 2025






# जिल्हा निर्यात संमेलन दि.11 जानेवारी 2025

## महाराष्ट्र निर्यात संमेलन उत्साहात संपन्न!

Posted on January 13, 2025 by Mohan Dube




*खासदार श्रीमती स्मिता वाघ तसेच आमदार सुरेश भोळे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन*

*जळगाव :* विकास आयुक्त उद्योग आणि महाराष्ट्र उद्योग व्यापार आणि गुंतवणूक सुविधा सेल चे अध्यक्ष राज्याचे निर्यात आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उद्योग केंद्र, जळगाव यांच्यावतीने आयोजित महाराष्ट्र निर्यात संमेलनाचे उद्घाटन खासदार श्रीमती स्मिता वाघ तसेच आमदार सुरेश भोळे यांच्या हस्ते हॉटेल प्रेसिडेंट कॉटेज येथे संपन्न झाले. यावेळी नाशिक विभागाच्या उद्योग सहसंचालिका श्रीमती वृषाली सोने, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक चेतन पाटील, व्यवस्थापक श्री डोंगरे, श्री पाटील, जिल्हा उद्योग केंद्र व खादी आणि ग्रामोद्योग मंडळ यांचे अधिकारी कर्मचारी तसेच उद्योग क्षेत्रातील नामवंत मंडळी उपस्थित होते.

या संमेलनात जळगाव जिल्ह्यातील लघु आणि मध्यम उद्योग यांना निर्यातीसंबंधी केंद्र तसेच राज्य शासनाच्या योजनांची माहिती यावेळी देण्यात आली तसेच निर्यात तज्ञांच्या मदतीने त्यांना मार्गदर्शन व सहकार्य प्रदान करण्यात आले.

या संमेलनासाठी निर्यात व उद्योग क्षेत्रातील उपनिदेशक.हिमांशू पांडे,उपनिदेशक, अंकित दिवेकर, महेश चौधरी, प्रणिता चौरे, सिद्धेश्वर मुंडे, जयेश राणे, तुषार परदेशी या तज्ञ सदस्यांनी आपापल्या विषयाचे मार्गदर्शन उपस्थित उद्योजकांना दिले. या कार्यक्रमासाठी जळगाव जिल्ह्यातील औद्योगिक संघटना पदाधिकारी तसेच उद्योजक उपस्थित होते. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक चेतन पाटील यांनी यावेळी उपस्थितांचे आभार मानले.

# गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणी सोडविण्याकरिता दि.2 जानेवारी 2025 रोजी आयोजित जिल्हा उद्योग मित्र समिती बैठक.



# उदयोजकांच्या समस्या सोडवण्यासाठी मा.मंत्री महोदय,उद्योग यांचे अध्यक्षतेखाली बैठक

## सिटी न्यूज

दिव्य मराठी जळगाव, गुरुवार, ३ एप्रिल २०२५

**दिलासादायक** • उद्योगमंत्री सामंत यांचा पुढाकार, जळगावच्या उद्योजकांसोबत बैठक

### आयटी कंपन्यांसाठी जळगावात एमआयडीसी व्यतिरिक्त १०० ते १५० एकर जागा देणार

प्रतिनिधी | जळगाव

जळगाव महापालिका व एमआयडीसीच्या माध्यमातून आकारण्यात येणाऱ्या दुहेरी करप्रणालीला उद्योजकांचा विरोध आहे. यासंदर्भात संपूर्ण राज्यातील शहरांचा अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात येणार आहे. तसेच कुसुंबा येथील वाढीव एमआयडीसीसाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. जळगावात आयटी कंपनी येणार असेल तर एमआयडीसी व्यतिरिक्त १०० ते १५० एकर जागा उपलब्ध करून देण्याची तयारी असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शहरातील उद्योजकांना दिली.

जळगाव एमआयडीसीतील उद्योग व उद्योजकांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात बुधवारी दुपारी मंत्री सामंत यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार सुरेश भोळे यांच्या नेतृत्वात लघू उद्योग भारतीचे अध्यक्ष प्रमोद संचेती, रवी फालक, संतोष इंगळे, किरण बच्छाव, महेंद्र रायसोनी यांच्यासह औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली.

शहरालगत औद्योगिक वसाहतीत कृषीसह अन्य घटकांसंबंधित आणि त्यावर अवलंबून असलेले अनेक लहान-मोठे उद्योग आहेत. शासनस्तरावरून दरवर्षी विविध योजनांची घोषणा केली जाते; मात्र आतापर्यंत औद्योगिक विकास महामंडळ परिसरात रस्ते, वीज, पाणी आणि कामगार वसाहतींसह अनेक मूलभूत सुविधांची वानवा आहे. या समस्यांचे उग्र स्वरूपच दिसून येत आहे. औद्योगिक वसाहतीतील मूलभूत समस्यांचे निवारण करा, अशी मागणी आमदार सुरेश भोळे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

#### कर आकारणीसंदर्भात समिती निर्णय घेणार

जळगाव एमआयडीसीत मनपा व एमआयडीसीकडून वेगवेगळे दोन कर आकारले जातात. ही आकारणी थांबवावी अशी मागणी अनेक वर्षांपासून उद्योजक करीत आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी शासनाच्या त्रिसदस्यीय समितीकडून राज्यभरात अभ्यास करून त्याचा अहवाल तयार केला जाणार आहे. नवीन प्रस्तावित असलेल्या औद्योगिक वसाहतीत महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून जागा आरक्षित करण्यासंदर्भात उद्योग मंत्र्यांनी सकारात्मकता दाखवली.

#### आरडीएसएस : उपकेंद्रासाठी जागेची मागणी

औद्योगिक वसाहतीसाठी आरडीएसएस योजनेत नव्याने चार उपकेंद्रे प्रस्तावित आहेत. त्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जागा उपलब्धतेसह वीज उपकेंद्रासाठी एमआयडीसीअंतर्गत अपूर्ण असलेल्या परवानग्यांसंदर्भात पूर्तता करावी, आवश्यकतेनुसार रोहित्र मंजुरीसाठी संबंधितांना आदेशित करावे, तसेच औद्योगिक वसाहतीमधील अग्निशमन केंद्र महापालिकेकडून एमआयडीसीकडे हस्तांतरित करावे अशी मागणी केली. त्यावर जिल्हाधिकारी, मनपा व महावितरण संयुक्तरीत्या निर्णय घेणार आहे.

#### परिवहन सुविधेला प्राधान्य

शहरात सुरू होणारी ई-बस सेवा ही एमआयडीसीतील कामगारांसाठी उपयोगी ठरेल. त्यामुळे या सेवेचा लाभ एमआयडीसी क्षेत्रातही मिळावा, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय परिसराची स्वच्छता, महामार्गावर आवश्यकतेनुसार झेब्रा क्रॉसिंगसह गतिरोधकांची सूचना करण्यात आली. भुसावळ पालिका प्रशासनाने नाले-गटारांमधील सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता सांडपाणी तापी नदीपात्रात सोडले आहे. त्यामुळे जळगाव औद्योगिक परिसरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. विदर्भाप्रमाणे खान्देशातील उद्योगांना सवलती देण्याची मागणी करण्यात आली.

---

लोकमत

## उद्योजकांकडून कर वसुलीची सक्ती नको

### उद्योगमंत्र्यांची सूचना, उद्योग भवनाचा ठेका रद्द करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : उद्योजकांकडून महापालिका आणि एमआयडीसी अशा दोन यंत्रणा कराची वसुली करीत आहेत. एकच कर लागू व्हावा यासाठी शासन पातळीवर चर्चा सुरू आहे, तोपर्यंत उद्योजकांकडून कर वसुली करताना सक्ती किंवा कंपनी सील करण्याची कारवाई करु नये, अशा सूचना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी महापालिका आयुक्तांना बुधवारी दिल्या.

आमदार सुरेश भोळे यांच्या नेतृत्वात लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष प्रमोद संचेती, रवी फालक, संतोष इंगळे, किरण बच्छाव, महेंद्र रायसोनी यांच्यासह औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद व महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित होते.

आरडीएसएस या योजनेमध्ये एमआयडीसीसाठी नवीन ४ सबस्टेशन प्रस्तावित आहेत. त्यासाठी जागा उपलब्ध करणे, महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी काही जागा या महिलांकरिता आरक्षित करणे, जळगाव शहरात उद्योग भवन उभारण्याचे काम संथ गतीने सुरु आहे, उद्योग भवन उभारण्याचा मक्ता रद्द करुन नवीन ठेकेदार नेमण्यात यावा या विषयांवर चर्चा करण्यात आली.

भुसावळ शहरातील सांडपाणी कुठलीही प्रक्रिया न करता भुसावळ नगरपालिकेने तापी नदी पात्रात सोडलेले आहे. तेथूनच जळगाव एमआयडीसीला पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे दूषित पाणीपुरवठा उद्योगांना होत आहे. त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

फायर स्टेशन एमआयडीसीने ताब्यात घेऊन स्वतः चालवावे, असाही निर्णय झाला. जळगाव एमआयडीसीने फायर स्टेशनचा प्रस्ताव पाठविलेला आहे. तो प्रस्ताव सीईओ यांच्याकडे प्रलंबित असल्याने तो मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या.

Hello Jalgaon
Page No. 1 Apr 03, 2025
Powered by: erelego.com

# 9. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (OFFICERS-STAFF TRAINING,SERVICE RELATED, JUDICIAL MATTERS AND USE OF ARTIFICIAL INTELLIGENCE TECHNOLOGY)

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे | दि.०१ एप्रिल २०२५ ते १२ एप्रिल २०२५ या कालावधीत कुंडल ता.पलूस येथे पायाभूत प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे.<br>तसेच दि 11 ते 15 नोव्हेंबर 2025 रोजी हैदराबाद येथे प्रशिक्षण |
| आ | पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे | कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण वेळोवेळी करण्यात येते. |
| इ | कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे | - |
| ई | कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर(AI) सुरु करणे. | - |

# कार्यालयीन कर्मचारी यांचे दि.०१ एप्रिल २०२५ ते १२ एप्रिल २०२५ या कालावधीत कुंडल ता.पलूस येथील पायाभूत प्रशिक्षण



# दि 11 ते 15 नोव्हेंबर 2024 या कालावधीत NIMS-ME हैदराबाद येथे प्रशिक्षण



# 10. नाविन्यपूर्ण उपक्रम (INNOVATIVE INITIATIVES)

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | कार्यालयात किमान २ नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे. | 01. दि. 11 जानेवारी 2025 रोजी जिल्ह्यातील उद्योजकांची निर्यात परिषद घेऊन मार्गदर्शन केले.<br>02. मेळावे आयोजित करून योजनांबद्दलची माहिती देण्यात आली.<br>03.हकदर्शक NGO सोबत काम करुन सीएमईजीपी योजनेचा लाभ उमेद अभियानादवारे जोडलेल्या महिलांपर्यंत पाहोचवला. |

# हक्कदर्शक NGO समन्वयक यांचे प्रशिक्षण व योजनेची माहिती






# 1.मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम(CMEGP)

- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गतअंर्तर्गत जिल्हयास जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास 449 व खादी ग्रामोद्योग कार्यालयास 299 असे एकुण 748 मंजूर कर्जप्रकरणांचे उद्दीष्ट प्राप्त आहे. या योजने अंतर्गत दि.31.03.2025 पर्यंत सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे .

| कार्यान्वयीन यंत्रणा | उद्दीष्ट | साध्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| जिल्हा उद्योग केंद्र | 449 | 487 | 108.46% |
| खादी ग्रामोद्योग | 299 | 176 | 58.86% |
| एकुण | 748 | 663 | 88.64% |

- उद्दीष्ट पूर्ततेच्या दृष्टीने कर्जप्रकरणे विविध बँक शाखांना शिफारशीचे प्रमाण वाढविण्याच्या उद्देशाने जिल्हयातील तांत्रिक शैक्षणिक संस्था, आयटीआय, एनजीओ, महिला बचत गट यांच्या माध्यमातुन जिल्हाभर मेळावे आयोजित करण्यात येवुन कर्ज प्रकरणे बँकांना शिफारशीचे प्रमाण उर्वरीत उद्दीष्टाच्या तीन पटीने कर्जप्रकरणे शिफारस करण्यात आले आहे. .

- .

# 2.पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम(PMEGP)

- पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत दिनांक 31.03.2025 अखेरपर्यंतची प्रगती खालीलप्रमाणे आहे

| उद्दीष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|
| भौतिक | आर्थिक(रु.लक्ष) | भैातिक | आर्थिक(रु.लक्ष) |
| 106 | 238.5 | 119 | 257.71 |

- सदर योजने अंतर्गत प्राप्त उद्दीष्ट पुर्ण झालेले असून तसेच ज्यांचे अनुदान दावे योजनेच्या पोर्टलवर सादर झालेले नाही त्यांचे अनुदान दावे पोर्टलवर सादर करणेकरीता बँकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

# 3.सुधारित बीज भांडवल योजना(SMS)

सुधारित बीज भांडवल योजनेअंतर्गत जिल्हयास खालीलप्रमाणे मंजूर कर्जप्रकरणांचे उद्दीष्ट प्राप्त झालेले आहे.

| **प्रवर्ग** | **बीज भांडवल रक्कम (रु.लाखात)** |
|---|---|
| सर्व साधारण(Gen) | 05.00 |
| एससीपी | 02.00 |
| आदिवासी उपयोजना | 01.00 |

उपरोक्त प्रमाणे जिल्हयाचे प्रकरणे मंजूरीचे उद्दीष्ट सदर 100 दिवसांच्या कार्यक्रम कालावधीत पुर्ण झालेले आहे.

# 4.उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम(EDTP)

- उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत जिल्हयास खालीलप्रमाणे  प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण करण्याचे उद्दीष्ट प्राप्त झालेले  आहे.

| **प्रवर्ग** | **प्रोत्साहन भत्ता रक्कम(रु. लाखात)** |
|---|---|
| सर्व साधारण(Gen) | 15.00 |
| एससीपी | 8.00 |
| टीएसपी | 3.60 |

सदर योजने अंतर्गत १०० दिवस कार्यक्रमाअंतर्गत एससीपी व टीएसपी देयके कोषागार कार्यालयात सादर करून निधी वितरीत करण्यात आला आहे.

# 5.सामुहिक प्रोत्साहन योजना (PSI)

- सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत विविध प्रयोजनार्थ मुद्रांक शुल्क सवलत प्रमाणपत्र, पात्रता प्रमाणपत्र तसेच अनुदान दावे कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यावर सत्वर कार्यवाही होवून परिपुर्ण प्रकरणांत विहीत कालमर्यादेत कार्यवाही पुर्ण करण्यात येत आहे.

- तसेच लोकसेवा हक्क अधिनियम अन्वये निश्चित केलेल्या कालावधीत सर्व प्रकारच्या प्रकरणे कार्यवाही करुन प्रलंबित प्रकरणांची संख्या निरंक ठेवण्यात येईल.

# 6.औद्योगिक विकास समुह योजना(Cluster)

- जिल्हयामध्ये सद्य:स्थितीत एकुण 01 औद्योगिक समुह मंजूर झालेला असून सदरचा औद्योगिक समुह कार्यरत झालेले आहे.
- जिल्हयामध्ये एकुण 03 औद्योगिक समुह प्रस्तावित असून पैकी 02 औदयोगिक समुह प्रगतीपथावर असून 01 प्रकल्पाचे प्रशिक्षण टप्पा पुर्ण झाला आहे.
- प्रस्तावित औद्योगिक समुहांपैकी

1.स्टीचर्स गारमेंट क्लस्टर चाळीसगांव

2.सनराईज फुड प्रोसेसिंग  क्लस्टर भादली, जळगांव

3. बनाना प्रोसेसिंग क्लस्टर.वाकोद पहुर जामनेर

# 7.पायाभूत सुविधा

- चोपडा ग्रामीण सहकारी औदयोगिक सहकारी मर्या. ता.चोपडा, जि.जळगांव यांना प्रस्तावित सीडी वर्क व अस्फाल्ट रोड इ. पायाभुत सुविधा उभारणीसाठी शासनाकडून 2.84 कोटी रु इतका प्रस्ताव मंजूर झाला असून पैकी 75 टक्के रक्कम शासनाकडून अनुदान स्वरुपात संस्थेला सहाय्य.

# JALGAON DISTRICT ODOP PRODUCTS – 01.BANANA 02.PLASTIC PVC PIPES




## Jalgoan

### Jalgaon Banana

**In 1960, a government initiative, led by farmers like Vasantrao Mahajan, aimed to promote banana plantation and commercial production in Khandesh, resulting in Jalgaon emerging as the Banana Hub.** This region now contributes around two-thirds of Maharashtra's banana production. Bananas hold significant socio-religious importance in Indian culture, often used in religious rituals. Jalgaon's banana exports have surged due to the adoption of global-standard farming practices. It's now recognized as the **"Banana City of India."** Drip irrigation, introduced in 1989, has tripled banana production in the district.

**Major Hubs:**
**Khandesh**

Banana production in Jalgaon district has been a significant source of employment for the local population. The cultivation, harvesting, and post-harvest activities associated with bananas provide jobs to a substantial number of people.

***Jalgaon district hosts the emerging Tapti Valley Banana Processing Cluster in Yaval.*** *The Jalgaon Banana earned its GI Tag in 2016, recognized for its distinct attributes. The banana production is estimated to produce 43,69,000 MT according to Horticulture Area Production Information System (HAPIS).*

ODOP






## Jalgoan

### Plastic PVC Pipes

Jalgaon has prominent units producing PVC Pipes. Manufacturing of PVC Pipes commence with a small annual capacity which was increased to more than 50 thousand MTs per annum by year 2000 making Jalgaon district as one of the largest producers of PVC Pipes i the country. **Jalgaon district has around 96 manufacturers of PVC multipurpose pipes majorly producing Irrigation pipes produce and exporting to international market.**

**Major Hubs:**
**Tandal Wadi, Jalgaon MIDC**

Over 200 PVC manufacturing facilities play a cr role in producing PVC pipes within the district. These units have been instrumental in creating job opportunities for the local community and catalysing economic advancement.

*Jalgaon has more than 200 companies of PVC pip which are widely used in various applications, including water supply, irrigation, drainage, plumbing, and construction.*

ODOP

# !!धन्यवाद!!